कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक २७/०९/२०१७

## *जिल्हयात वेगवेगळया ठिकाणी अवैध दारु विक्रेत्यांवर धाड*

- *एकूण अडीच लाखांची देशी- विदेशी दारू जप्त, तीन आरोपींविरुध्द गुन्हा दाखल*

मिळालेल्या गुप्त माहीतीच्या आधारे मा. पोलीस अधिक्षक सो. यांचे आदेशान्वये तसेच पोलीस निरीक्षक, स्थागुशा गडचिरोली प्रदीप लांडे यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हयात वेगवेगळया ठिकाणी अवैध दारु विक्रेत्यांवर स्थागुशा गडचिरोली दारुबंदी पथकाने धाड टाकल्या. यामध्ये गीता माधवराव निमजे, रा. आंबेडकर वॉर्ड, ता. देसाईगंज, ही बाई आपले राहते घरी अवैधरित्या विदेशी दारु विक्री करत असल्याच्या गुप्त माहितीवरुन दोन पंचासमक्ष नमुद महिला आरोपीच्या घराची अवैध दारु संदर्भात घरझडती घेतली असता नमुद आरोपीच्या घरातुन इम्पीरिअल ब्ल्यु विस्की कंपनीच्या ५० नीपा किंमत १५,०००/- रु., हायवर्ड ५०० सुपरस्ट्रॅांग कंपनीच्या बियर एकुण १७ बॉटल किंमत ४,७००/- असा एकुण १९,७००/- रु. चा माल अवैधरित्या मिळून आल्याने आरोपी विरुध्द पोस्टे देसाईगंज येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याचबरोबर नामे गोपाल नारायण जुआरे, रा. ठाणेगाव, ता. आरमोरी याने आपले राहते घरी अवैधरीत्या देशी, मोहा फुल हातभट्टी दारु विक्रीकरीता बाळगली असल्याची माहीती मिळताच दोन पंचासमक्ष नमुद आरोपीच्या घराची घरझडती घेतली असता १७५ लीटर हातभट्टी मोहा फुलांची दारु एकुण किंमत २६,२५०/- रु. चा माल मिळुन आल्याने सदर आरोपी विरुध्द पोस्टे आरमोरी येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच नामे सतीष बाबुराव बावणे, रा. श्रीराम चौक आलापल्ली, ता. अहेरी हा आपल्या राहत्या घरी अवैध दारु विक्री करीत असल्याची माहीती मिळताच दोन पंचासमक्ष नमुद आरोपीच्या घराची अवैध दारु संदर्भात घरझडती घेतली असता आरोपीच्या घरातुन बॉम्बे स्पेशल विस्की कंपनीच्या ८०० नीपा किंमत ९६,०००/- रु., इम्पीरिअल ब्ल्यु विस्की कंपनीच्या २८८ नीपा किंमत ८६,४००/- रु., ऑफीसर चॉईस कंपनीच्या ९६ नीपा किंमत २८,८००/- रु असा एकुण २,११,२०० रु. चा माल मिळून आल्याने आरोपी विरुध्द पोस्टे अहेरी येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सर्व नमुद आरोपींविरुध्द महा. दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास चालु आहे. सदर कारवाई स्थागुशा गडचिरोली दारुबंदी

पथकाच्या सफौ इंगोले, करकाडे, पोहवा गुरनुले, दुर्गे, पोना चवारे, मपोशि चव्हाण, साखरे, चापोशि पातकमवार, चवरे यांनी पार पाडली.

